# संस्थेचे पाच वर्षांचे नियोजन करणे महत्त्वाचे

## डॉ. डी. टी. शिर्के; वाय. डी. माने जयंतीनिमित्त 'यशोगाथा' स्नेहमेळावा




**कागल : कागल एज्युकेशन सोसायटीच्या स्नेहमेळाव्यामध्ये बोलताना डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी व्ही. आर. देशपांडे, प्रताप ऊर्फ भैया माने, सुनील माने, डॉ. प्रवीण चौगले, बिपीन माने, वाय. डी. चव्हाण, डॉ. बी. एस. थोरात आदी.**

कागल, ता. २६ : 'कागल एज्युकेशन सोसायटीने केलेला विकास आणि संस्था विस्तार अभिनंदनीय व अनुकरणीय आहे. पुढील पाच वर्षांचे नियोजन करणे संस्थेच्या गुणवत्तावाढीसाठी महत्त्वाचे आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. (कै.) वाय. डी. माने (अण्णा) यांच्या ८९ व्या जयंतीनिमित्त आयोजित 'यशोगाथा' या स्नेहमेळाव्यामध्ये ते बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, ''वाय. डी. माने (अण्णा) यांनी दि कागल एज्युकेशन सोसायटीच्या रूपाने लावलेल्या रोपट्याचे आज वटवृक्षामध्ये रूपांतर झाल्याची बाब गौरवास्पद आहे. पुढील पाच वर्षांचे नियोजन करणे संस्थेच्या गुणवत्तावाढीसाठी महत्त्वाचे आहे. विद्यार्थीकेंद्रित सुविधा देण्यासाठी संस्थेने नेहमीच कटिबद्ध असले पाहिजे.''

स्नेहमेळाव्यास संस्थेचे अध्यक्ष व्ही. आर. देशपांडे, सचिव प्रताप ऊर्फ भैया माने, उपाध्यक्ष सुनील माने, प्राचार्य डॉ. प्रवीण चौगले, बिपीन माने, वाय. डी. चव्हाण, संस्थेच्या बालगृहाचे माजी विद्यार्थी वैद्यकीय अधिकारी डॉ. बी. एस. थोरात, माजी पोलिस उपअधीक्षक सतीश माने आदींची प्रमुख उपस्थिती होती.

भैया माने म्हणाले, ''संस्थेच्या सध्या २७ शाखांमध्ये सात हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेच्या विकासासाठी प्रत्येक शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या संख्यात्मक वाढीबरोबरच गुणवत्तावाढीवर आणखी भर देणे अपेक्षित आहे.''

या वेळी प्राचार्य डॉ. प्रवीण चौगले, डॉ. बी. एस. थोरात यांनी मनोगत व्यक्त केले. स्वागत शिल्पा पाटील यांनी केले. डॉ. शर्मिली माने यांनी आभार मानले.

# जपानवर महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव : इकेदा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाच्या भेटीप्रसंगी मार्गदर्शन करताना जपानी बौद्ध भिक्खू कानशीन इकेदा.

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

जपान हा देश महात्मा गांधींच्या शांती, सत्य, अहिंसा या तत्त्वांनी प्रभावित आहे. जपानमधील प्रत्येक नागरिक गांधीजींच्या विचारांनी प्रेरित आहे, असे प्रतिपादन जपानी बौद्ध भिक्खू कानशीन इकेदा यांनी शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागात एका संवाद कार्यक्रमात व्यक्त केले.

इवेदा हे विज्ञान शाखेचे पदवीधर असून गांधीजींच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांचा शांती, प्रेम, अहिंसा हा संदेश जगभरामध्ये पोहचविण्यासाठी गेली दोन वर्षे ते वेगवेगळ्या देशांना भेटी देत आहेत. त्यांनी आजवर इंग्लंड, अमेरिका, तसेच आशिया व आफ्रिकेतील एकूण १५ देशांना भेटी दिल्या आहेत. तसेच दक्षिण आफ्रिकेमध्ये गांधी-मंडेला शांती मोहिमेमध्ये तीन महिन्यात १३०० कि.मी. पदयात्रा केली आहे. सध्या ते भारत दौऱ्यावर असून त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाला भेट दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना महात्मा गांधींचे विचार व त्याना विविध देशांमध्ये आलेले अनुभव कथन केले.

कानशीन इकेदा म्हणाले, सध्या जगात साधी राहणी, निसर्गाशी स्नेहपूर्ण नाते व विविध संस्कृतींचे शांततापूर्ण सहअस्तित्व या विचारांवर आधारित जगण्याची गरज आहे. इकेदा यांच्या भाषणानंतर उपस्थित विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून त्यांच्याशी संवाद साधला. या कार्यक्रमाला विदेशी भाषा विभाग प्रमुख डॉ. मेघा पानसरे, जपानी भाषा शिक्षिका स्नेहल शेट्ये व विद्यार्थी उपस्थित होते.

# मोडी लिपी कार्यशाळा ३० पासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रातर्फे मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. ३० डिसेंबर ते पाच जानेवारी या कालावधी शिवाजी विद्यापीठात ही कार्यशाळा होणार आहे.

शिवपूर्वकाळापासून ते स्वातंत्र्यकाळापर्यंत प्रशासनाची तसेच दैनंदिन कामकाजासाठी मराठी भाषे बरोबराच मोडी लिपी मुख्य लिपी असल्याने या काळाबाबतचा इतिहास अभ्यासण्यासाठी, तसेच प्रशासकीय नोंदीसाठीही लिपीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. १९६० पूर्वीच्या शेतीसंबंधीच्या नोंदी, जन्म-मृत्यू नोंदी, खरेदी पत्रे तसेच या काळातील न्यायालयीन दावे यासंबंधीची सर्व कागदपत्रे ही मोडी लिपीतच उपलब्ध आहेत. त्यामुळे रोजगाराची नवी संधी मिळू शकेल. मच्छिंद्र चौधरी, डॉ. नीलांबरी जगताप यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.


# केरळमध्ये कंकणाकृती सूर्यग्रहण; कोल्हापुरात मात्र खंडग्रासचे दर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** देशाच्या कानाकोपऱ्यांतून खगोल निरीक्षक प्रामुख्याने केरळ या ग्रहणपट्ट्यातील जवळच्या राज्यात बहुसंख्येने पोहोचले. पुणे, मुंबई, कोल्हापूर येथून गेलेल्या विविध संस्था आणि व्यक्तींचा यात समावेश होता. कोल्हापुरात मात्र ढगाळ वातावरणामुळे सुरुवातीला अंशत: आणि नंतर खंडग्रास सूर्यग्रहण पाहायला मिळाले. शिवाजी विद्यापीठात नॅनो सायन्स विभागाच्या छतावरुन सुमारे ५०० हून अधिक खगोलप्रेमींनी सूर्यग्रहण पाहिले.

भारतीय प्रमाणवेळेनुसार हे सूर्यग्रहण ८ वाजून ०४ मिनिटांनी सुरु झाले. त्याचा मध्य म्हणजे कंकणाकृती अवस्था ९ वाजून २२ मिनिटांनी सुरु झाली, ती तीन मिनिटे राहिली. १० वाजून ५९ मिनिटांनी सूर्यग्रहणाचा मोक्ष झाला.

आदित्य वेल्हाळ



**कोल्हापुरात खंडग्रास सूर्यग्रहणास ८.०४ मिनिटांनी प्रारंभ झाला. ढगाळ वातावरणात सूर्यग्रहणाच्या प्रारंभापासून ते मोक्षावस्थेच्या म्हणजे ११ वाजून ०४ मिनिटांपर्यंतच्या टिपलेल्या या अवस्था.**

कोल्हापुरातील कुतूहल फौंडेशन, चिल्लर पार्टी विद्यार्थी चित्रपट चळवळ, खगोल मंडळ, शिवाजी विद्यापीठातील अवकाश विज्ञान विभागाच्या निरीक्षकांशिवाय डॉ. राजेंद्र भस्मे, किरण गवळी अशा हौशी खगोल निरीक्षकांनी केरळमधील विविध भागांतून कंकणाकृती सूर्यग्रहण पाहिले.

चिल्लर पार्टी विद्यार्थी चित्रपट चळवळीतील मिलिंद यादव, सलीम महालकरी, सचिन पाटील, उदय संकपाळ, रोहित कांबळे, अभय बकरे, शिवप्रभा लाड, आर्दीनी केरळ येथील मुझ्झकुन्नू येथून कंकणाकृती सूर्यग्रहण पाहिले. सूर्यग्रहणाच्या पट्ट्यातील हा मध्यबिंदू होता. येथून तब्बल तीन मिनिटे १० सेकंद ग्रहण पाहायला मिळाले.

शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश निरीक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर, जयसिंगपूरचे डॉ. प्रशांत चिकोडे, पदार्थविज्ञान विभागाच्या प्रा. नम्रता कांबळे यांच्यासह पीएच.डी., एम.एस्सी. आणि बी.एस्सी. करणाऱ्या विद्यार्थ्यांसह १२ जणांनी केरळमधील पायनूर येथून सूर्यग्रहण पाहिले. यावेळी सकाळी ८.०४



**कोल्हापुरातील खगोल अभ्यासक डॉ. राजेंद्र भस्मे यांनी केरळ येथील कासारगौडजवळील बेकलफोर्ट येथे टिपलेले हे कंकणाकृती सूर्यग्रहणाचे प्रतिबिंब.**

मिनिटांपासून ११.०४ वाजेपर्यंतच्या ग्रहणकाळात सूर्यप्रकाशाच्या तीव्रतेवर कसा परिणाम होतो, याच्या नोंदी पायरॉनोमीटर या यंत्राद्वारे नोंदविल्या.

केरळमधील इरिटी येथून ज्यांनी सूर्यग्रहण पाहिले, त्यांत कुतूहल फौंडेशनच्या आनंद आगळगावकर, अनिल वेल्हाळ, सागर बकरे, अनिकेत कामत यांच्यासह २८ निरीक्षकांचा समावेश होता.

### केरळमध्ये नागरिक घरात

सूर्यग्रहणाच्या काळात केरळ राज्यातील नागरिकांनी घरात बंदिस्त राहणे पसंत केले. धार्मिक कारणांमुळे रस्त्यांवर अघोषित बंदी होती, असे चित्र दिसत होते. उलट वेगवेगळ्या ठिकाणांहून आलेले खगोल निरीक्षक मात्र रस्त्यावर होते, असे निरीक्षण शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश निरीक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर, खगोल अभ्यासक किरण गवळी, चिल्लर पार्टीचे मिलिंद यादव यांनी नोंदविले. सकाळी आठ ते ११ या वेळेत बहुतेक सर्व मंदिरे दर्शनासाठी बंद ठेवण्यात आल्याचेही यादव यांनी सांगितले.


## तीन मिनिटे सूर्यग्रहण

दुर्बीण, आणि शक्तिशाली कॅमेऱ्यांच्या साहाय्याने खगोल निरीक्षकांनी या कंकणाकृती सूर्यग्रहणाचे दर्शन घेत त्याची प्रकाशचित्रे घेतली. तीन मिनिटांची ही अवस्था केरळ, कर्नाटक आणि तमिळनाडू या तीन राज्यांतील १२० किलोमीटर रुंदीच्या ग्रहणपट्ट्यात वायव्येकडून आग्नेयेकडे सरकली

## ग्रहणादरम्यान तापमानात उतार

शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश निरीक्षण केंद्राच्या चमूने डॉ. व्हटकर यांच्या मार्गदर्शनाखाली केरळमधील पायनूर येथे ग्रहणकाळातील सूर्यप्रकाशाच्या तीव्रतेवर कसा परिणाम होतो, याच्या नोंदी पायरॉनोमीटर या यंत्राद्वारे नोंदविल्या.

पुढारी




कोल्हापूर : ग्रहण सुरू झाल्यानंतरच्या सूर्यकला.




कोल्हापूर : ग्रहण सुटत असतानाच्या सूर्यकला. (छाया : तय्यब अली)

# ...चंद्र आहे साक्षीला!

## ढगाळ वातावरणामुळे सूर्यग्रहणामध्ये काही काळ अडथळा

कोल्हापूर : प्रतिनिधी

**खंडग्रास ग्रहण अनुभवण्याची संधी कोल्हापूरकरांना गुरुवारी मिळाली. यानिमित्ताने सूर्यग्रहणाचे निरीक्षण व वैज्ञानिक माहितीची देवाणघेवाण झाली. सकाळपासून ढगाळ वातारणामुळे सूर्यग्रहण पाहताना खगोलप्रेमींना अडथळे येत होते.**

जेव्हा चंद्र हा सूर्य व पृथ्वीच्या मधे येतो, तेव्हा पृथ्वीवर चंद्राची सावली पडते. या सावलीतून दिसणाऱ्यास्थितीलासूर्यग्रहणम्हणतात.जेव्हासूर्याचा काही भाग चंद्राच्या मागे जातो, तेव्हा दिसणाऱ्या स्थितीला खंडग्रास सूर्यग्रहण म्हणतात. २०१९ या वर्षातील शेवटचे खंडग्रास सूर्यग्रहण कोल्हापूरकरांना गुरुवारी पाहायला मिळाले. वर्ष २००० च्या तुलनेत यावर्षी २१ टक्के ढगाळ वातारण राहील, असा अंदाज खगोलशास्त्राच्या अभ्यासकांकडून बांधण्यात आला होता. सकाळपासून ढगाळ वातावरण असल्याने सुरुवातीला सूर्यग्रहण पाहताना अडचणी आल्या.

शिवाजी विद्यापीठात अवकाश संशोधन विभाग आणि पदार्थ विज्ञान विभागाच्या वतीने स्कूल ऑफ नॅनो सायन्सच्या इमारतीच्या छतावरून सूर्यग्रहण पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. सकाळी ८ वाजून ४ मिनिटांनी सूर्यग्रहणाला सुरुवात झाली. सकाळपासूनच विद्यापीठासह महाविद्यालयांत खगोलप्रेमी, संशोधक, विद्यार्थी, आबालवृद्धांची मोठी गर्दी होती.

जसजसा ग्रहणाचा काळ पुढे जात होता, तसतसे ग्रहण पाहण्याची प्रत्येकामध्ये उत्सुकता होती. मात्र, ढगाळ वातावरणामुळे अधूनमधून सूर्याचे दर्शन होत होते. ग्रहण पाहण्याकरिता विशिष्ट कागदापासून तयार केलेले सूर्यग्रहण पाहण्याचे चष्मे, फिल्टर वापरून खगोलप्रेमींनी सूर्यग्रहण पाहण्याचा आनंद लुटला.

> “यापुढील सूर्यग्रहण २१ जून २०२० रोजी पाहावयास मिळणार आहे. हे ग्रहण सकाळी १० वाजून ३ मिनिटांपासून चालू होऊन दुपारी १ वाजून २८ मिनिटांपर्यंत राहणार आहे. या ग्रहणाचा कालावधी ३ तास २५ मिनिटे एवढा असून ते खंडग्रास पद्धतीचे असणार आहे.
>
> **डॉ. मिलिंद कारंजकर,**
> पदार्थ विज्ञान व खगोलशास्त्र विभागप्रमुख

९ वाजून २३ मिनिटांनी सर्वात जास्त म्हणजे ८४ टक्के सूर्याचा पृष्ठभाग झाकला गेला. सकाळी १० वाजून ५९ मिनिटांनी ग्रहण पूर्णपणे संपले. नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या शंकांचे मराठी विज्ञान परिषदेचे पदाधिकारी, संशोधकांनी निरसन केले. दक्षिण भारतातील केरळ (कासारगुड) आणि सौदी अरेबिया, ओमान, श्रीलंका व इंडोनेशिया आदी ठिकाणांवरून कंकणाकृती सूर्यग्रहण दिसले. यावेळी मराठी विज्ञान परिषदेचे शिवाजीराव पाटील, प्रा. डॉ. अनिल घुले, प्रा. इराण्णा उडचण आदी उपस्थित होते.

दरम्यान, विवेकानंद महाविद्यालयात विद्यार्थी व नागरिकांनी सूर्यग्रहणाचा आनंद लुटला. महाविद्यालयाच्या छतावर अत्याधुनिक टेलीस्कोप बसविण्यात आला होता. याच्या माध्यमातून निरनिराळ्या सौर फिल्टरच्या साहाय्याने २००० विद्यार्थी, पालक, परिसरातील नागरिकांनी सूर्यग्रहण पाहिले. २ तास ५६ मिनिटे एवढ्या कालावधीत हे सूर्यग्रहण चालले. महाविद्यालयाच्या अत्याधुनिक सॉफ्टवेअरच्या माध्यमातून सकाळी ग्रहणास सुरुवात झाल्यापासून संपेपर्यंत प्रत्येक सेकंदातील सूर्याची स्थिती ही स्क्रीनद्वारे दाखवण्यात आली.